# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २५८ /०८ दिनांक :

१) श्री. खंडू धुळा लोखंडे, अर्जदार
मु. पो. अंकलगी, ता. जत,
जि. सांगली.

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
कवठे महांकाळ, सांगली.

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उप विभाग, संख,
जि. सांगली.

**कोरम** :- १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य-सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)

विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार



## न्याय निर्णय

श्री. जी.सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे दिलेला न्याय निर्णय दिनांक :१४.०१.२००९

१) श्री. खंडू धुळा लोखंडे, रा. अंकलगी, ता. जत यांनी आपल्या शेतामध्ये शेतीपंपासाठी वीज कनेक्शन मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर वि.प.ने सांगितल्याप्रमाणे रककम भरुनही वीज कनेक्शन मिळाले नाही म्हणून अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली सर्कल यांचंकडे ' क्ष ' नमुन्यात दि. २२.५.२००८ चा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर अंतर्गत कक्षाने जा.क्र. अअ/सामं/तां/जेई वर्क्स/६२५० दि. २८.७.२००८ ने आदेश पारित केला. सदरचा निर्णय मान्य न झाल्याने श्री. खंडू लोखंडे यांनी अपील अर्ज दि. २४.१०.२००८ रोजी परिमंडळ कार्यालय, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांचेकडे पोष्टाने पाठविला.

२) सदरचा अर्ज मंचास प्राप्त झाल्यानंतर वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व सदर कामी दि. १.१२.२००८ रोजी सांगली सर्कल येथे वि.प.च्या कार्यालयात सुनावणी व अधिक म्हणणे देण्यासाठी तारीख ठेवली. सुनावणी दिवशी वि.प. तर्फे संबंधित अधिकारी उपस्थित होते, मात्र ग्राहक गैंरहजर होता. अर्जात ग्राहकाने हजर राहण्याबद्दल असमर्थतता व्यक्त केली आहे. सबब वि.प.ने हजर केलेली कागदपत्रें, कथने, अर्जदाराने दाखल केलेली तक्रार व त्यासोबतची कागदपत्रें यावरुन तक्रारीचा तपशिल खालील प्रमाणे -

३) श्री. खंडू धुळा लोखंडे, रा. अंकलगी यांनी आपल्या शेतातील पंपासाठी वीज जोडणीसाठी रितसर अर्ज केला. त्यानंतर वि.प.ने दिलेल्या कोटेशन प्रमाणे दि. ३०.१२.१९९८ रोजी रु. ४६४५/- इतकी रक्कम पा.क्र. ६७६९५६० ने जमा करुनही वीज जोडणी दिली नाही. दि. ७.९.२००४ रोजी तपासणी अहवाल दिल्याचे 'क्ष' अर्जात नोंदविले आहे. तसेच दिनांक ६.९.२००४ कपॅसिटर खरेदी करुन तपासणी करुन घेतल्याची बील व तपासणी अहवाल जोडला आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांनी दि. २८.७.२००८ रोजी निर्णय देवूनही मजला वेळेत जोडणी दिली नाही ५ महिने विलंब झाला आहे. एस.ओ.पी. प्रमाणे वीज जोडणी मिळावी अशी मागणी आहे.

४)	वि.प.तर्फे असे सांगण्यात आले की, लघुदाब वाहिनीचे काम होणेचे आहे. तसेच जागेवर संच मांडणी व आवश्यक बाबींची पूर्तता केलेली नसल्याने संच मांडणी करुन, तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर वीज जोडणीचा विचार करावा लागेल.

५)	अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली सर्कल यांनी वि.प.स कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर नैंसर्गिक न्याय तत्वानुसार ' प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य ' या प्रमाणे जोडणी द्यावी असा आदेश पारित केला आहे.

मुळ तक्रार अर्ज व त्यासोबत दाखल केलेली कागदपत्रे, वि.प.चे म्हणणे व कथने अंतर्गत कक्ष सांगली सर्कल यांचा निर्णय याचा एकत्रित विचार करता,खालील मुद्दे निष्कर्षास उद्‌भवतात.

१)	अर्जदार ग्राहकास वीज जोडणी देण्यास विलंब झाल्यामुळे भरपाई रक्कम वि.प.कडून मिळणे योग्य आहे का ?

उत्तर :	होय योग्य आहे.

२)	मागणी अर्जाबाबतची आवश्यक कागदपत्रे अर्जदाराकडून वि.प.ने मागविणे योग्य आहे कय ?

उत्तर :	होय. आवश्यक आहे.

३)	आदेश ?

उत्तर :	अखेरच्या आदेशाप्रमाणे.



कारणमिमांसा

७)	संबंधित प्रकरणाचा तपशिलवार विचार करता, रक्कम भरुन घेतल्यावर म्हणजे दि. ३०.१२.१९९८ रोजी ग्राहकाने फक्त रु. ४६४५/– भरणा केलेला दिसतो. ग्राहकाने त्यानंतर दि. ६.९.२००४ रोजी कपॅसिटर खरेदी करुन वि.प.कडून तपासणी करुन घेतल्याचे दिसून येते. त्याचवेळी तपासणी अहवालही दिल्याचे दिसते. तथापी त्या संदर्भात आवश्यक सत्य प्रत जोडलेली नाही. त्यास अनुसरुन वि.प.ने तपासणी केली वा जागेवर संच मांडणी वा तत्सम बाबींची पूर्तता झाली नाही असे नोंदविले आहे. मात्र वि.प.नेही त्यासंबंधित संयुक्त पाहणी अहवाल सादर केलेला नाही. तसेच अंतर्गत कक्षाच्या सुनावणी दरम्यान वि.प.तर्फे आपले म्हणणे नोंदवितांना वीज पुरवठा करणेसाठी करावे लागणारे काम या सदराखाली कोणतीच नोंद केली नाही. मात्र तपशिलात लघुदाब वाहिनीचे काम पूर्ण केल्यावर वीज जोडणी देता येईल असे नमूद केले आहे. सदरची विधाने परस्पर विरोधी वाटतात. त्यामध्ये अथवा नंतरच्या दाखल केलेल्या कागदपत्रात वि.प.तर्फे लघुदाब वाहिनी अथवा इतर कामासंबंधात तसे कोठेच नमूद करण्यात आलेले नाही. याचाही विचार करावा लागेल. तसेच वि.प.तर्फे रक्कम जमा केलेल्या तारखेच्या तपशिलाकडेही दूर्लक्षच झालेले दिसून येते. अंतर्गत कक्षाकडील वि.प.च्या म्हणण्याची ३०.२.१९९८ अशी नोंद तर नंतर दि. १७.११.२००८ च्या अहलवाल क्र. १५३५ मध्ये २३.१२.२००४ अशी नोंद आहे. पण प्रत्यक्षात ३०.१२.१९९८ हिच नोंद योग्य आहे. ग्राहकानेही आपल्या तक्रार व मागणी अर्जात ' क्ष ' फॉर्ममध्ये किंवा ' अ ' मध्ये सविस्तर तपशिल नोंदविणे आवश्यक होते. (किती एच.पी. ची मागणी आहे. गट क्रमांक कोणता, अर्ज केलेली तारीख इ.) तसे केल्याचे व आवश्यक कागद जोडले नसल्याचे दिसून येते. (उदा. अर्ज दाखल पोच, तपासणी अहवाल कॉपी इ.) प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या नैंसर्गिक न्यायाने जोडणी द्यावी असे कक्षाने कळविले आहे. तसेच असल्यास स्थानिक कार्यालयात तशा प्रकारची यादी प्रकाशित केली आहे काय ? याचाही विचार करावा लागेल. वरील सर्व बाबींचा विचार करता, अर्जदाराने रक्कम भरल्यानंतर विनियमातील तरतुदीप्रमाणे १ महिन्यात जोडणी देणे आवश्यक होते अथवा अर्ज अपूर्ण असल्यास तसे कारणासहीत कळविणे योग्य होते. यापैंकी वि.प.ने कांहीही केलेले नाही. तथापी २००३ चे वीज अधिनियम

मधील तरतुदींचा व त्यानंतर अस्तित्वात आलेले २० जानेवारी २००५ नंतरचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग विनिमय २००५ विचार करावा लागेल. सबब २० जानेवारी २००५ ते वीज जोडणी दिलेला दिनांक १४.११.२००८ या कालावधीचा भरपाई निश्चितीकरणासाठी विचार करावा लागेल.

अर्जदाराने दि. ३०.१२.१९९८ वि.प.ने सांगितल्याप्रमाणे रक्कम जमा केली आहे. त्यानंतर वि.प.ने अर्जाच्या पूर्ततेबद्दल कोणताही पत्र–व्यवहार केलेला दिसून येत नाही. मध्यंतरीच्या काळात ग्राहकाने दि. ६.९.२००४ रोजी कपॅसिटर खरेदी बील व तपासणी अहवाल दिल्याचे नोंदविले आहे. ग्राहकाने विद्युत संच मांडणी केलेली नसल्याचे तसेच कागदपत्रांची पूर्तता केल्यावर विद्युत अधिनियम २००३ व विनियम २००५ मधील तरतुदीनुसार जोडणी देता येईल हे म्हणणे अयोग्य वाटते. विद्युत संच मांडणी व तपासणी अहवाल याची पूर्तता झाल्यावरच जोडणी देता येईल हे बरोबर आहे. तथापी वि.प.कडून जोडणी देणेची तयारी पूर्ण झाली आहे व संच मांडणी व कागदपत्रांची पूर्तता त्वरीत करावी अशा आशयाचे पत्र जाणे योग्य होते. शेतात विहिरीवर पंपसेट बसविणे, कपॅसिटर, स्टार्टर इ. व्यवस्था जोडणी देण्याची तारीख पक्की नसेल तर किती दिवस सदरची व्यवस्था उघड्यावर ठेवणे योग्य आहे. तसेच बंद स्थितीत सामानाच्या चोरीचा उपद्रव होईल तो वेगळाच या गोष्टीचा विचार करुनच वि.प.ने तसे कळविणे योग्य होते. तथापी वि.प.ने आपली जबाबदारी पार पाडलेली नाही.



रक्कम भरुनही विनियमातील तरतुदीप्रमाणे वीज जोडणी देण्यास झालेल्या विलंबाबद्दल २० जानेवारी २००५ ते १४.११.२००८ या कालावधीतील २०० आठवड्याचे प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे रु. २०.०००/– इतकी भरपाई वि.प.ने देणे योग्य होईल. ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे त्यास वीज पुरवठा दि. १४.११.२००८ रोजी चालू झाल्याने वेगळ्या आदेशाची जरुरी नाही. सबब खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१) अंतर्गत कक्ष सांगली यांचा या तक्रार अर्ज प्रकरणाचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

२) वीज जोडणी देण्यास विलंब झाल्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकाच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी व भरपाईचे निश्चितीकरण) विनिमय २००५ मधील परिशिष्ट अ मधील कलम ३ प्रमाणे २०० आठवड्यांचे प्रति आठवडा रु. १००/– प्रमाणे रु. २०,०००/– इतकी नुकसान भरपाई वि.प.ने ग्राहकास द्यावी.

३) वेगळ्या खर्चाचा व इतर आदेश नाही

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

दिनांक : १४.०१.२००९

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

---

ग्राहक तक्रार क्र. २५८ /०८ दिनांक :

१) श्री. खंडू धुळा लोखंडे, अर्जदार
मु. पो. अंकलगी, ता. जत,
जि. सांगली.

**विरूध्द**

१)　कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, विश्रामबाग,
सांगली.

२)　कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.　　　　विरूध्द पक्षकार
कवठे महांकाळ, सांगली.

३)　सहाय्यक अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
उप विभाग, संख,
जि. सांगली.

**<u>कोरम</u> :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
४) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

# न्याय निर्णय

श्री. के.वाय.जगताप, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे दिलेला न्याय निर्णय दिनांक :१९.०१.२००९

१) श्री. खंडू धुळा लोखंडे, रा. अंकलगी, ता. जत यांनी आपल्या शेतामध्ये शेतीपंपासाठी वीज कनेक्शन मिळण्यासाठी अर्ज केल्यानंतर वि.प.ने सांगितल्याप्रमाणे रककम भरुनही वीज कनेक्शन मिळाले नाही म्हणून अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली सर्कल यांचंकडे ' क्ष ' नमुन्यात दि. २२.५.२००८ चा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर अंतर्गत कक्षाने जा.क्र. अअ/सामं/तां/जेई वर्क्स/६२५० दि. २८.७.२००८ ने आदेश पारित केला. सदरचा निर्णय मान्य न झाल्याने श्री. खंडू लोखंडे यांनी अपील अर्ज दि. २४.१०.२००८ रोजी परिमंडळ कार्यालय, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांचेकडे पोष्टाने पाठविला.

२) सदरचा अर्ज मंचास प्राप्त झाल्यानंतर वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व सदर कामी दि. १.१२.२००८ रोजी सांगली सर्कल येथे वि.प.च्या कार्यालयात सुनावणी व अधिक म्हणणे देण्यासाठी तारीख ठेवली. सुनावणी दिवशी वि.प. तर्फे संबंधित अधिकारी उपस्थित होते, मात्र ग्राहक गैंरहजर होता. अर्जात ग्राहकाने हजर राहण्याबद्दल असमर्थतता व्यक्त केली आहे. सबब वि.प.ने हजर केलेली कागदपत्रें, कथने, अर्जदाराने दाखल केलेली तक्रार व त्यासोबतची कागदपत्रें यावरुन तक्रारीचा तपशिल खालील प्रमाणे –

३) श्री. खंडू धुळा लोखंडे, रा. अंकलगी यांनी आपल्या शेतातील पंपासाठी वीज जोडणीसाठी रितसर अर्ज केला. त्यानंतर वि.प.ने दिलेल्या कोटेशन प्रमाणे दि. ३०.१२.१९९८ रोजी रु. ४६४५/– इतकी रक्कम पा.क्र. ६७६९५६० ने जमा करुनही वीज जोडणी दिली नाही. दि. ७.९.२००४ रोजी तपासणी अहवाल दिल्याचे ' क्ष' अर्जात नोंदविले आहे. तसेच दिनांक ६.९.२००४ कपॅसिटर खरेदी करुन तपासणी करुन घेतल्याची बील व तपासणी अहवाल जोडला आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांनी दि. २८.७.२००८ रोजी निर्णय देवूनही मजला वेळेत जोडणी दिली नाही ५ महिने विलंब झाला आहे. एस.ओ.पी. प्रमाणे वीज जोडणी मिळावी अशी मागणी आहे.

४) वि.प.तर्फे असे सांगण्यात आले की, लघुदाब वाहिनीचे काम होणेचे आहे. तसेच जागेवर संच मांडणी व आवश्यक बाबींची पूर्तता केलेली नसल्याने संच मांडणी करुन, तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर वीज जोडणीचा विचार करावा लागेल.

५) अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली सर्कल यांनी वि.प.स कागदपत्रांची पूर्तता झाल्यावर नैंसर्गिक न्याय तत्वानुसार ' प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य ' या प्रमाणे जोडणी द्यावी असा आदेश पारित केला आहे.

मुळ तक्रार अर्ज व त्यासोबत दाखल केलेली कागदपत्रे, वि.प.चे म्हणणे व कथने अंतर्गत कक्ष सांगली सर्कल यांचा निर्णय तसेच कृति मानके व अधिनियम २००६ चा विचार करता खालील मुद्दे याचा एकत्रित विचार करता,खालील मुद्दे निष्कर्षास उद्‌भवतात.

मुद्दा क्र. १ : अर्जदाराने वीज पुरवठा मिळणे बाबत दिलेल्या अर्जाप्रमाणे त्यास वीज पुरवठा देण्यास विलंब झाला असे जे अर्जदाराचे म्हणणे आहे व त्यामुळे त्यास महाराष्ट्र वीज नियामक आयोग विनियम २००५ कृति मानके प्रमाणे भरपाई मिळण्याचा जो अधिकार प्राप्त झाला, त्या बाबतचे मूळ कारण ( cause of action ) किती तारखेस घडले ?

उत्तर : दिनांक २०.३.२००५

मुद्दा क्र. २ : अर्जदाराची भरपाई मिळणे बाबतची मूळ मागणी ही ( cause of action ) महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचे रेग्युलेशन २००६ मधील कलम ६.६ प्रमाणे मुदतीमध्ये(२ वर्षामध्ये )आहे काय ?

उत्तर : नाही

मुद्दा क्र. ३ : अर्जदारास अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिलेल्या आदेशाप्रमाणे विद्युत पुरवठा करण्यात आला आहे काय ?

उत्तर : होय

मुद्दा क्र. ४ : अर्जदारास भरपाई मिळणेचा हक्क / अधिकार आहे काय ?

उत्तर : नाही

मुद्दा क्र. ५ : आदेश ?

उत्तर : अखेरचे आदेशाप्रमाणे

कारणमिमांसा

या प्रकरणामध्ये अर्जदाराने दि. ३०.१२.१९९८ रोजी रु. ४६४५/– विद्युत पुरवठ्यासाठी वि.प.कडे भरल्याचे वि.प.स मान्य आहे. पुढे अर्जदाराचे क्ष अर्जातील म्हणण्यानुसार, ता. ७.२.२००४ रोजी त्यांनी तपासणी अहवाल (Test Report) दिला होता. तसेच सदर विद्युत पुरवठा करणे बाबत ९ विजेचे खांब व त्यावर तारांचे जाळे उभारणे आवश्यक होते. तसेच २० जानेवारी २००५ पर्यत अर्जदारास विद्युत पुरवठा केलेला

नव्हता हेही वि.प.स मान्य आहे. वीज नियामक आयोग विद्युत पुरवठा व नुकसान भरपाई यांचे कृती मानके विनियम २००५ प्रमाणे असा विद्युत पुरवठा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३ महिन्यांचा कालावधीमध्ये देणेत आलेला आहे. कृती मानके अस्तित्वात येवून त्याची अंमलबजावणी २०.१.२००५ पासून झाली असलेने या पूर्वीचा काळ विचारात घेतला नाही तरी अर्जदारास वि.प.तर्फे विद्युत पुरवठा मिळणेचा अधिकारी ता.२०.३.२००५ रोजी प्राप्त झाला. तसेच असा विद्युत पुरवठा ता. २०.३.२००५ पर्यंत न झाल्याचे कृती मानके २००५ प्रमाणे भरपाई मिळण्याचाही अधिकार प्राप्त झाला. सबब मुळ अर्जाप्रमाणे भरपाई मिळणेच्या हक्कास कारण २०.३.२००५ रोजी झाले असा आम्ही मुद्दा क्र. १ कडे निष्कर्ष दिला आहे

कृती मानके २००५ भरपाईचे निश्चितीकरण व त्याची रक्कम या बाबतचा विचार हा महाराष्ट्र वीज नियामक आयोगाचे रेग्युलेशन २००६ मधील कलम ६.६ प्रमाणे ग्राहकाचे तक्रारीबाबत तक्रार मंचापुढे प्रकरण आलेनंतर त्यामध्ये भरपाईच्या हक्कास मुळ कारण केंव्हा घडले याचा विचार करुन अशा बाबत प्रकरणाची मुदत

ही २ वर्षे या कालावधीची निश्ति केली आहे. सबब या प्रकरणामध्ये ता. २०.३.२००५ ( cause of action ) नंतर पुढे २ वर्षांचा काळ हा २०.३.२००७ अखेर संपुष्टात आला आहे. मुळ क्ष नमुन्यातील अर्ज हा ग्राहकाने ता. २२.५.२००८ रोजी दिलेला असल्याने हा कालावधी २ वर्षांपेक्षा जास्त होत असलेने अर्जदाराच्या नुकसान

भरपाईची मागणी बाबतचा हक्क व कारण ( cause of action ) हे क्ष नमुन्यातील अर्जाच्या तारखेपर्यंत मुदतबाह्य

झाले असल्याने या मंचास या प्रकरणामध्ये भरपाईच्या हक्काचा विचार करता येणार नाही व त्यास कृती मानके प्रमाणे भरपाई देता येणार नाही. सबब मुद्दा क्र. २ कडे आम्ही नकारार्थी उत्तर दिलेले आहे.

..४..

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दि. २८.७.२००८ रोजी अर्जदारास कृति मानके प्रमाणे विद्युत पुरवठा

२००४ मध्ये टेस्ट रिपोर्ट दिला होता अशा बाबत अर्जदाराकडे स्थळप्रत दिल्याचा पुरावा नाही. तसेच जरी तो टेस्ट रिपोर्ट दिला आहे असे गृहीत धरले तरी त्यानंतरच्या ६ महिन्यांच्या कालावधीनंतर तो संपुष्टात

येतो. म्हणून अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे आदेशानुसार नव्याने टेस्ट रिपोर्ट देणे आवश्यक होते. वि.प.ने

दाखल केलेल्या म्हणण्यामध्ये असा टेस्ट रिपोर्ट ता. १८.८.२००८ रोजी त्यांना प्राप्त झाला व तदनंतर ३ महिन्यांच्या कालावधीमध्ये म्हणजे तारीख १४.११.२००८ रोजी अर्जदारास विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे. असा विद्युत पुरवठा अर्जदारास मिळाले बाबत त्याने तशी पावती लिहून दिलेली आहे व ती या प्रकरणात दाखल आहे. परिणामी, अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचे आदेशाप्रमाणे त्यास विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे असे आमचे अनुमान आहे. सबब मुद्दा क्र. ३ कडे आम्ही होकारार्थी उत्तर दिले आहे.

वरील प्रमाणे मुद्दा क्र.१ ते ३ चा विचार करता तसेच विशेषत: मुद्दा क्र.२ जो मुदतीच्या कायद्या संबंधात आहे याचा विचार करता, तसेच अर्जदाराने अ नमुन्यात दिलेल्या अर्जात नुकसान भरपाई बाबत कोणतीही मागणी केली नसल्याने तसेच त्याची मुळ भरपाईची मागणी ही मुदतबाह्य असलेने त्यास भरपाई मिळणेचा अधिकार नाही व देण्याचा प्रश्न उदभवत नाही. सबब आम्ही मुद्दा क्र. ४ कडे नकारार्थी उत्तर दिले आहे.

वरील प्रमाणे मुद्दा क्र. १ ते ४ यांचा व त्याबाबतचे कारणांचा विचार करता, सदरील अपील फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. अर्ज़दारास अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या आदेशाप्रमाणे नियमाप्रमाणे विद्युत पुरवठा देण्यात आलेला आहे. सबब त्यांची कोणतीही तक्रार उरत नाही मात्र सर्व प्रकरणाचा विचार करता, खर्चाबाबत आदेश करण्याची आम्हास आवश्यकता वाटत नाही. सबब आदेश –

## <u>आदेश</u>

१) अर्जदाराचे अपील क्र. २५८ हे रद्द करण्यात आलेले आहे.

२) अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचा आदेश कायम ठेवण्यात आलेला आहे.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी करणेत यावी व ती केलेची महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ कलम ८–७) च्या तरतुदीनुसार मंचास कळविण्यात यावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )

अध्यक्ष,

दिनांक : १६.१२.२००८ ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..

सदस्य सचिव, ग्राहक तक्रार निवारण मंच यांचे म्हणणे / मत तक्रार प्रकरण क्र. २५८/०८

श्री. खंडू धुळा लोखंडे, रा. अंकलगी, ता. जत, जिल्हा सांगली यांनी ग्राहक तक्रार निवारण मंच. म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित, कोल्हापूर परिमंडळ यांजकडे तक्रार प्रकरण क्र. २५८/०८ ने दाखल केलेल्या नवीन शेती पंप वीज जोडणीला वीज पुरवठा करण्यास झालेल्या विलंबा बाबतच्या तक्रारीवर सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांचे म्हणणे/मत खालील प्रमाणे मांडणेत येत आहे.

तक्रारदार ग्राहकाने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे दि. २७.५.२००८ ला क्ष नमुन्यातील अर्जात तक्रार दाखल केली होती. त्यावर कक्षाने निकाल पत्र आदेश क्र. ६२५० दि. २८.७.२००८ ने निकाल दिला आहे. सदर निकाल मान्य न झालेने तक्रारदाराने विहीत अ नमुन्यात नसलेला अपील अर्ज मंचाकडे दि. ३१.१०.२००८ रोजी दाखल केला. त्यानुसार मंचाने कार्यवाही सुरु केली. मुद्देनिहाय अहवालाची संबंधित अधिकाऱ्याकडून मागणी केली. व सुनावणीची तारीख १.१२.२००८ ठिकाण सांगली मंडल कार्यालय अशी ठरविण्यात आली.

श्री. खंडू धुळा लोखंडे, रा. अंकलगी, ता. जत, जिल्हा सांगली यांनी नवीन शेतीपंप जोडणीस वीज पुरवठा मिळणे करीता मागणी दाखल केली आहे. त्यानुसार त्यास मंजुरी मिळून दि. ३०.१२.१९९८ रोजी वितरण कंपनीकडे अनामत रक्कम भरली आहे. विद्युत मोटर पंप बसविण्याठी चाचणी अहवाल दि. ७.९.२००४ ला सादर केला होता. परंतु प्रत्यक्षात जागेवर मोटर पंप संचाची जोडणी केली नसल्याचे आढळल्यामुळे तो रद्द केला गेला. ग्राहकाने सुधारीत चाचणी अहवाल दि. १८.८.२००८ रोजी दाखल केला त्यानुसार एस.ओ.पी. प्रमाणे लघुदाब वीज वाहिनी उभारुन जोडणी देण्यास असलेल्या ग्राह्य कालावधीत म्हणजे तीन महिन्यांच्या आत म्हणजे १४.११.२००८ रोजी वीज जोडणी देण्यात आली आहे. त्यानुसार वीज जोडणी मिळाल्याची ग्राहकाची पोच पावती मंचाकडे दाखल करण्यात आलेली आहे.

दिनांक १.१२.२००८ रोजी सुनावणीच्यावेळी वितरण कंपनीतर्फे श्री. उत्पात, सहाय्यक अभियंता,जत उप विभाग हे एकमेव उपस्थित होते. तक्रारदारातर्फे कोणीही उपस्थित नव्हते सदर अनुपस्थितीची मंचाने नोंद घेतली.

तक्रारदाराने वीज जोडणी दि. १४.११.२००८ रोजी मिळाली असल्याचे लिहून दिले आहे. त्यामुळे तक्रारीचे निवारण झाले आहे व तक्रार निकालात निघाली आहे असे स्पष्ट होते.

महाराष्ट्र वीज नियामक आयोग अस्तित्वात २००५ पासून आल्यामुळे व ग्राहकाची दि. ३०.१२.१९९८ पासून वीज जोडणी मिळाली नसल्याची तक्रारीवर भरपाई करिता नंतर अस्तित्वात आलेला आयोगाचे विनिमय २००५ मधील कृती मानकेनुसार लागू राहणार नाही.

तसेच ग्राहकाची वीज जोडणी देण्याची मागणी पूर्ण झाली असलेमुळे आयोगाचे अधिनियम २००५ कृती मानकेनुसार मुदतीत झाला आहे व ग्राहकाने अर्जात नुकसान भरपाईची मागणी केली नाही.

वरील प्रमाणे सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांचे म्हणणे / मत मांडण्यात येत आहे.

( एस.आर. बांबळे )
सदस्य सचिव,
दिनांक : २२.०१.२००९ ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर